विवर्त

प्रस्तुत - विवेक वडकर

(शब्दांकन – सुहास काळे)

चित्रकार :- विवेक किसन वडकर

पत्ता :- ए -००४,निलेश अपार्टमेंट,

विठ्ठल नगर ता. कर्जत, जिल्हा.रायगड,महाराष्ट्र,पिन- ४१०२०१

मोबाईल क्र. :- +९१-९४२३३७८०२६ / +९१-९१३९५२८५९४

या पुस्तकातील चित्रांचे सर्व हक्क चित्रकाराकडे असून त्यांच्या परवानगीशिवाय या चित्रांचा किंवा त्यातील काही भागांचा वापर करणे हा कायदेशीर गुन्हा आहे.

www.vvadkarpaintings.com

“जन्म आणि मृत्यू यांमधील अंतरादरम्यान मनुष्य जे जे काही अनुभवतो ती ती सगळी कला आहे..
आणि त्यादरम्यान नियतीने त्याला दिलेले बरे वाईट अनुभव अनुभवून ,त्यातले काही आत्मसात
करून त्यांना कॅनवास वर व्यक्त करणारा,त्यांना कॅनवास ,रंग यांच्या
माध्यमातून वाट मोकळी करून देणारा तो कलाकार म्हणवला जातो ..”

– चित्रकार विवेक वडकर --

प्रस्तुत - विवेक वडकर

विवर्त

ई साहित्य प्रतिष्ठान

फाईनआर्टिस्ट

निसर्गावर असीम प्रेम करणारा ,निसर्गाची उपासना त्याच्या कुंचल्याने करणारा असा एक अवलिया कलाकार... निसर्गाने केलेली रंगांची मनसोक्त उधळण आपल्या डोळयांनी अलगद टिपणारा आणि डोळ्यात साठवलेली ती दृश्य कॅनवास वर ओतणारा...

खोपोली चित्रकला महाविद्यालय,रायगड येथून "कलाशिक्षक पदविका"(A .T .D .) संपादन केल्यानंतर विवेक वडकर यांनी स्वतंत्ररित्या "फाईनआर्टिस्ट" म्हणून आपले काम सुरु केले. तैलरंग, ऍक्रेलिक अशाविविध रंगशैलीतुन आपल्या कलाकृती त्यांनी साकारल्या आहेत.वास्तववादी चित्रकलेवर त्यांचा अधिक हातखंडा आहे.

विशेषतः निसर्गाला ते आपलं प्रथम प्रेरणास्थान मानतात.त्यांच्यामते निसर्गाकडे पाहताक्षणीच आपण या जगात कुणीच नाही याची प्रकर्षाने जाणीव आपल्याला होते. मग जे जे काही आपल्या चर्मचक्षूंनी साठवलं ते ते सारं कॅनवास वर कधी एकदा उतरवतो असं होऊन जातं.निसर्गाने त्यांना दिलेला आनंद आणि मिळालेला अनुभव फक्त आपल्यापुरताच मर्यादित ठेवणं हे त्यांच्यातल्या संवेदनशील चित्रकाराला पटत नाही.आणि हेच कारण आहे कि मिळालेला तो अनुभव ते आपल्या वास्तववादी चित्रशैलीतून आपल्यापुढे जसाच्या तसा मांडण्याचा प्रयत्न करतात.ज्या क्षणाचे आपण साक्षीदार ठरलो त्या क्षणाचे साक्षीदार इतरही व्हावेत याचसाठी हा अट्टाहास.

आपल्या नित्य जीवनातली तशी वरवर साधीच वाटणारी दृश्य ..पण एका कलाकाराचा त्या प्रत्येक दृश्याकडे बघण्याचा दृष्टिकोन अगदी वेगळा असतो.जे आपल्या नजरेला पटकन दिसत अथवा जाणवत नाही ते एका कलाकाराला सहज दिसून जातं.आणि बघता बघता आपल्यासमोर अलगद साकार होते एक कलाकृती..ज्यांना कलेची जाण आहे. अशा लोकांना चित्रं कळणं हि काही विशेष गोष्ट नाही.पण ज्यांना कलेचं व्याकरण कळत नाही अशा लोकांनाही त्यांच्या वास्तववादी शैलीतली चित्रं सहज कळतात..आणि हेच कारण आहे कि त्यांची चित्रं थेट मनाचा ठाव घेतात.

- - सुहास काळे, डोंबीवली.

SMEARING OF COLOURS...

SIZE : 48" X 36"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

SMEARING OF COLORS.....तैलचित्र

साधेपणातही स्वतःच रंगीत वेगळेपण जपणाऱ्या ह्या राजस्थानी बायका ...स्वतः तर रंगीत आणि कलासक्त आयुष्य जगतातच ,पण दुसऱ्यांच्याही आयुष्यात रंगांची उधळण करतात...

WATERING PLACE

SIZE : 48" X 19"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

WATERING PLACE...तैलचित्र

पाणवठा ...एक असं ठिकाण जिथे भारतामधील खेड्यांमधल्या बायका एकत्र जमतात
..एकमेकींची सुख दुःख वाटून घेतात...
त्यांची ती दुःख त्या वाहत्या पाण्यात वाहून जातात...
हा पाणवठा त्यांच्यासाठी भेटण्याचं ठिकाण , वाट पाहण्याचं ठिकाण
,gossiping च ठिकाण ,काम करण्याचं ठिकाण...असं सगळं काही आहे..
जस आम्हा पांढरपेशा लोकांचं कॉर्पोरेट ऑफिस ...!

SEARCHING A TRUE FRIEND

SIZE : 34" X 25"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

SEARCHING A TRUE FRIEND ... तैलचित्र

आजच्या या धकाधकीच्या जगात या लहानग्याबरोबर खेळायला कुणीच नाही..
अखेर त्याने आपल्या सावलीलाच आपला मित्र बनवलंय...

GRACE

SIZE : 33" X 20"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

GRACE … तैलचित्र

दिसण्यापेक्षा असणं महत्वाचं असतं...
आणि तिने नजाकतीने साकारलेल्या कामातून ,
त्यातील आकर्षकतेतून आणि कुशलतेतून तिचं ते असणं
आपोआप व्यक्त होतं ...

अनुभूती

निसर्गाने मानवाला पाच ज्ञानेंद्रिये दिली आहेत. ह्या पाच किंवा किमान एका ज्ञानेंद्रियाचा कल्पनांशी आणि अनुभवांशी संगम झाला की मिळते ती अनुभुती. माणसाला निसर्गाने दुसरी देणगी दिली ती रंगांमधला फरक ओळखण्याची व रंगसंगती लावण्याची. ध्वनी, रंग आणि गंध ह्या तीनही गोष्टी आपलं आयुष्य फार सुरेख करतात. त्यांचं स्वत:चं एक विश्व आहे. रंग म्हणजे जादू आहे. त्याच्याशी खेळतो तो जादूगार. विवेक वडकर, असाच एक जादूगार.

विवेक आपलं रोजचं जगणं, लहान लहान अनुभव आपल्या चित्रातून हुबेहूब कॅनव्हासवरती उतरवतो. मुद्दामहुन 'हटके' असं काही करुन दाखवण्याचा त्याचा अट्टाहास नसतो. फक्त "ह्या हृदयीचे त्या हृदयी" पोहोचवणे इतकाच त्याचा उद्देश्य असतो. विवेकच्या चित्रांमध्ये डोळयांना सुखावणारा साधेपणाचा स्पर्श आहे.त्याच्या चित्रातुन शांतरस वाहतो. त्याची काही चित्रं तर नुसती बराच वेळ बघत रहाविशी वाटतात ती त्या चित्रातल्या शांतरसामुळे. मी पाहीलेलेल्या, नपेक्षा "अनुभवलेल्या" विवेकच्या एकाही चित्रात मला "बटबटीतपणा" जाणवला नाही. ही चित्रं विवेकचं व्यक्तीमत्व दाखवतात असं मला वाटतं. त्याचं व्यक्तीमत्व चित्रात उतरतं म्हणून ती साधी आणि आपलीशी वाटतात. विवेकचे प्रत्येक चित्र आपल्यापर्यंत पोहोचतं. "ऍबस्ट्रॅक्ट" हा देखिल एक कलाविष्कार आहे ह्यात दुमत नाही पण प्रत्येक सामान्यमाणूस त्याला जाणू शकेलच असं नाही.

विवेकची बहुतेक चित्र ही निसर्गाशी नाते सांगणारी आहेत. महान कलाकार लिओनार्दो - दा - व्हिन्सी यांनी म्हंटल्याप्रमाणे "चित्रकला म्हणजे कविता असते". अनेकदा शब्दांत जे मांडता येत नाही ते चित्रातून व्यक्त होऊ शकतं. विवेक त्याच्या कविता कॅनव्हासवरती उतरवत रहातो. त्यांना लय मिळते. अख्या कॅनव्हासचीच एक कविता बनून जाते. त्या रंगीत कवितांमध्ये निसर्ग असतो, प्राणी असतात, संथ पाण्यावरती विसावलेल्या बोटी असतात. तर कधी फुले विकणारी एखादी बाई. क्वचित आळसावलेल्या दुपारी सावलीचा पदर तोंडावर खेचून बसलेली गल्ली देखिल दिसते.

त्या गल्लीत डोळ्यांना कुणी दिसत नसलं तरी वाळत घातलेले कपडे न दिसणार्यांचा वावर जाणवून देतात. खेडेगावातलं वातावरण आणि कष्ट करुन पोट भरणारे कष्टकरी लोक, त्यातुनही विशेषत: लहान मुलं हा विषय स्वत:च्या चित्रकलेतून त्याने मोठ्या प्रमाणावरती हाताळलाय. विवेकला त्याच्यावरती डॉक्युमेंट्री बनवायचीही इच्छा आहे.

वॅन गॉघ हे जगप्रसिद्ध चित्रकार म्हणाले होते "मी स्वप्नात माझी चित्र बघतो ..... आणि चित्रांत माझी स्वप्न उतरवतो!" ते खरे असावे. माझ्या दृष्टिने कुठलीही कला हा आत्मशोध असतो. कलाकार त्या आत्मशोधातून स्वत:चे व्यक्तीत्व, स्वत:चे विचार चिमटीत पकडण्याची धडपड करत असतो. चित्रांच्या माध्यमातून विवेकचा आत्मशोधाचा हा प्रवास असाच उत्तरोत्तर खुलत जावा. तो त्याने त्याच्या नवनवीन चित्रातून आम्हांला दाखवावा हीच इच्छा!

- सौरभ वैशंपायन, मुंबई.

A JWEL LANE

SIZE : 40" X 22"

MEDIUM : ACRYLIC ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

A JWEL LANE ... ऍक्रेलिक

बरकरणी तसं साधंच दिसणारं
एका छोट्याश्या बोळातलं हे दृश्य...ह्या फाटक्या बोळाच्या
मानेतला सूर्यकिरणांमुळे लकाकणारा
दोरीवरल्या कपड्यांचा जणू हार
...हेच काय ते त्या बोळाच वैभव ...

SOUL FOR SELL

SIZE : 24" X 36"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

SOUL FOR SELL ....तैलचित्र

आम्हाला इथे विकायला आणलंय ...पण नक्की कशासाठी ?? माहित नाही ..खरंतर
आम्ही शेतकऱ्याचा आत्मा आहोत ..पण त्यांची विवशता अथवा नाईलाज
आम्हाला इथवर घेऊन आलाय बहुतेक ...

TRIBAL LIFE

SIZE : 28" X 38"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

TRIBAL LIFE.... तैलचित्र

आपल्यासारख्या लोकांसाठी फिशिंग हा फक्त एक खेळ किंवा छंद असू शकतो..पण या मुलांसाठी ती एक गरज आहे...
पण हि मुलं त्यातही आपला आनंद शोधतात ...त्यांनी त्यासाठी केलंय फक्त इतकंच कि त्यांनी आपल्या गरजेलाच
आपला खेळ बनवून टाकलाय ...आणि ते त्यात खुश आहेत..

NIDHI...तैलचित्र

एका लहानग्या मुलीच्या अप्रतीम भावमुद्रा ...निधी

NIDHI

SIZE : 36" X 24"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

४९ वा स्टेट गव्हर्नमेंट अवॉर्ड,मार्च २००९- महाराष्ट्र राज्य सरकार द्वारा मुंबई येथे आयोजित

RUSTIC GLANCE

SIZE : 24″ X 32″

MEDIUM : ACRYLIC ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

RUSTIC GLANCE .... ॲक्रेलिक

गावाच्या वेशीवर उभं राहून गावाकडे ओझरता कटाक्ष टाकताच तिथल्या निरव शांततेचा,
मोकळया आभाळाचा,निसर्गाचा,मृदगंधाचा आपल्याला तत्क्षणी परीसस्पर्श होतो..
आणि क्षणार्धात आपण तिथलाच एक गावकरी होऊन जातो...
परतीच्या वाटेवर निघत असताना टाकलेला तो "खेडूत कटाक्ष" मग आपल्याला वर्षभर पुरतो...

मनस्वी कलाकार...

जन्म आणि मृत्यू यांमधील अंतरादरम्यान मनुष्य जे जे काही अनुभवतो ती ती सगळी कला आहे..आणि त्यादरम्यान नियतीने त्याला दिलेले बरे वाईट अनुभव अनुभवून ,त्यातले काही आत्मसात करून त्यांना कॅनवास वर व्यक्त करणारा, त्यांना कॅनवास ,रंग यांच्या माध्यमातून वाट मोकळी करून देणारा तो कलाकार म्हणवला जातो ..हे म्हणणं आहे चित्रकार विवेक वडकर यांचं..

सरळ आणि सहज स्वभावाचा विवेक जेव्हा एखादी कलाकृती घडवायला सुरुवात करतो तेव्हा तो त्यात इतका हरवून जातो कि जणू सगळं जग त्या काळापुरतं त्याच्यासाठी शून्यवत झालेलं असतं..बालपणापासूनच निसर्गात हरवून जाणारा असा हा माणूस..निसर्गाचीभिन्न भिन्न रूपं पाहून अचंबित होणारा ,मग त्यातल्या सौंदर्याचा ,अविष्काराचा शोध घेत तिथवर पोहोचणारा..आणि अलगद सगळं टिपून कॅनव्हासवर उतरवणारा असा हा मनस्वी कलाकार...

निसर्गच त्याच प्रेरणास्थान..आणि म्हणूनच त्याने साकारलेली निसर्गचित्र पाहणाऱ्याला तात्काळ ती अनुभूती देतात.. क्लिष्ट, परंपरागत आणि व्याकरणबद्ध चित्रकलेपेक्षा साधं सोप्प वास्तववादी चित्रण हा त्याचा हाताळणीचा प्रमुख विषय..लोकांना भासमान गोष्टींमध्ये आणि कल्पनाविश्वात रमवण्यापेक्षा वास्तवाचं भान आणि जाणीव करून देणारी त्याची चित्रं जनसामान्यांवर अधिराज्य गाजवतात..

सामान्यातल्या सामान्य गोष्टी या त्याच्या चित्रातल्या नायक असतात..ईश्वराने चहूकडे सौंदर्याची पखरण केली आहे पण सगळेच त्याचा आस्वाद घेऊ शकत नाहीत ..बहुदा त्यासाठी जी सौंदर्यदृष्टी लागते ती प्रत्येकाकडे नसावी अथवा मग दैनंदिन रामरगाड्यात त्यांच्यातली ती संवेदनशीलता कुठेतरी लोप पावली असते किंवा मग जशी दिव्याला काजळी येते तशी ती झाकोळलेली असते...त्याच्या मते ईश्वराने कलाकाराची नेमणूक यासाठीच केली आहे कि त्याने जगाला हे सर्व दाखवावं आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून साकारून ...या जगङ्व्याळ पसाऱ्यात ज्या गोष्टी नकळत जनसामान्यांच्या नजरेतून सुटल्या आहेत त्यांचं दर्शन त्याने आपल्या कलाकृतींमार्फत करून देऊन जगाचं लक्ष पुन्हा एकदा त्याकडे वेधलं जावं यासाठी..

निधी उपाध्याय, उदयपुर

SMART APPEARANCE

SIZE : 24" X 19"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

SMART APPEARANCE.... तैलचित्र

कुणी सांगितलं कि
attitude
फक्त तुम्हा माणसांमध्येच असतो ?
माझ्यात तो तुम्हाला दिसत नाही??

GAME OF REFLECTION...

SIZE : 40" X 27"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

GAME OF REFLECTION... तैलचित्र

समुद्रकिनाऱ्यावरच्या खडकावर सूर्यप्रकाशाने केलेल्या किमयेने साकारली गेलीय एक भाससृष्टी...
जणू काही एखादा ग्रहच खडकावर उतरलाय...

FLORIST'S PALETTE
SIZE : 48" X 31"
MEDIUM : OIL ON CANVAS
www.vvadkarpaintings.com

FLORIST'S PALETTE... तैलचित्र

चित्रकाराकडे जशी रंगाची palette
असते अगदी तशीच या फुलवालीकडची palette..
या तिच्या palette मधून रंगांसोबत सुगंधाची,
आनंदाचीही उधळण होतेय ...

AN ARABLE LAND

SIZE : 22" X 33"

MEDIUM : ACRYLIC ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

AN ARABLE LAND... ऍक्रेलिक

वरून वरून हे रिक्त दिसणारं माळरान .
पण यात आपल्यासारख्या अनेकांची पोट भरण्याची क्षमता आहे!!...
अहो एक बी पेरून तर पहा ...
आणि मग बघा काय किमया घडते !!!

आपल्या नित्य जीवनातली तशी वरवर साधीच वाटणारी दृश्य ..

पण एका कलाकाराचा त्या प्रत्येक दृश्याकडे

बघण्याचा दृष्टिकोन अगदी वेगळा असतो.

जे आपल्या नजरेला पटकन दिसत अथवा जाणवत नाही ते एका कलाकाराला

सहज दिसून जातं.आणि बघता बघता आपल्यासमोर अलगद साकार होते एक कलाकृती..

ज्यांना कलेची जाण आहे.

अशा लोकांना चित्रं कळणं हि काही विशेष गोष्ट नाही.पण ज्यांना कलेचं व्याकरण कळत नाही

अशा लोकांनाही त्यांच्या वास्तववादी शैलीतली चित्रं सहज कळतात..

आणि हेच कारण आहे कि त्यांची चित्रं थेट मनाचा ठाव घेतात.

BASKET FULL OF ELAN

SIZE : 50" X 34"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

इंटरनॅशनल आर्टिस्ट मॅगझीन अंतिम प्रतिस्पर्धी
जून - जुलै २०१२.

BASKET FULL OF ELAN... तैलचित्र

वैशाखवणव्याच्या काहिलीत झाडाच्या देठापासून कधीच्याच
दूर झालेल्या या फुलांनी आपला टवटवीत जिवंतपणा अद्याप जपला आहे..
चैतन्याने रसरसलेल्या फुलांची ही आशादायी टोपली..

Simply for love

Everyone discusses my art and pretends to understand,

as if it were necessary to understand,

when it is simply necessary to love.

-Cloude Monet

मोने या जगप्रसिद्ध चित्रकाराचे हे विचार. यातील शेवटचे वाक्य (art) it is simply necessary to love, विवेक वडकर यांच्या चित्रांना तंतोतंत लागू पडते, इतकी वडकरांची चित्रे सुंदर आहेत. चित्रकलेचे ढोबळमानाने दोन प्रकारात वर्गीकरण होते. अमूर्त आणि वास्तववादी असे हे दोन प्रकार. वास्तववादी शैलीत दृश्यांचे किंवा चित्रकाराच्या मनातील भावनांचे चित्रण हे यथातथ्य स्वरूपात केले असते. वडकरांची चित्रे वास्तववादी प्रकारात येतील असे आपण म्हणू शकू.

वास्तववादी शैलीतील वडकरांची चित्रे कॅनव्हासवर रंगांचा मुक्तहस्ताने वापर करतात. त्यांचे रंग मुक्त असले तरी ते आकाराची सीमा सोडत नाहीत. वडकरांनी चित्रांसाठी रोजच्या जगण्यातील दृश्यविषय घेतले आहेत. त्यामध्ये काम करणाऱ्या स्त्रिया, निसर्ग, प्राणी, पाणवठा असे साधे विषय आहेत. या साधेपणातही एक सौन्दर्य आहे. Watering Place हे चित्र पाणवठ्यावर धुणी धुणाऱ्या बायकांचे आहे. पण आपण जेव्हा बारकाईने निरीक्षण करतो तेव्हा जाणवेल कि धुणी धुणाऱ्या बायका म्हणजे Human objects, पाण्याचा स्रोत आणि दगड, जमीन एकमेकात एकरूप झाले आहेत. हि एकरूपता चित्राला अमूर्ततेचा आभास देते. Florist's Pallete या चित्रातील रंगांचा वापर हा उत्साहवर्धक आहे. गडद रंगामध्ये काम करणाऱ्या स्त्रिया रंगवल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर उजळ रंगात रंगवलेला झिनियाचा गुच्छ चित्रात तयार करतो. कष्ट करून फुले विकणाऱ्या ह्या स्त्रिया. उजळ रंगातील हि फुले इतरांच्या जीवनात आनंद आणतात पण गडद रंगात रंगवलेल्या स्त्रिया कदाचित त्यांचे कष्टमय जीवन दाखवत नसतील ना? वडकरांचे आणखी एक मला भावलेलं चित्र म्हणजे Waiting for Mother. आपण एका नजरेत म्हणू कि हे तर वासरू आहे. पण जेव्हा नीट लक्षपूर्वक पहिले तर आपण यातला अर्थ शोधू शकतो कि हे वासरू आपल्या आईची वाट बघत आहे. वासरू आईच्या आठवणीने हिरमुसून बसल आहे. मलूल चेहरा या बछड्याला आईची किती आठवण येत आहे हेच दाखवत आहे.

वडकरांच्या शैलीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे detailing ला, बारकाव्यांना दिलेले प्राधान्य. चित्रांमधील प्राणी असो (पहा Smart Appearance) किंवा मनुष्य (पहा Grace, Smearing of colours) किंवा निसर्गातील दगड, जमीन पाणी (पहा Game of Reflection) प्रत्येक चित्रात Details वर केलेली मेहनत दिसून येते. हे Details चित्रात जिवंतपणा आणतात.

असे म्हणतात कि चित्रांचा अर्थ ज्याने त्याने आपल्या विचार करण्याच्या दृष्टीप्रमाणे शोधावा किंवा तो शोधूच नये आणि फक्त चित्रातील आकार, रंग, पोत , लयबद्धता आणि या सर्वांमुळे निर्माण झालेल्या सौन्दर्याचा आस्वाद घ्यावा. वडकरांची चित्रे हि दोन्ही प्रकारच्या दर्शकांसाठी बनली आहेत. आपण मात्र या चित्रांच्या सौन्दर्याचा आस्वाद घेऊया.

– कनक वाईकर

GREEN VELVET

SIZE : 24" X 32"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

GREEN VELVET....तैलचित्र

प्रत्येक गोष्टीला शब्दांनी व्यक्त करण्याची गरज नसते ..काही गोष्टी फक्त दृष्टीस पडल्या तरी सगळं आपोआप अनावृत्त होत...

WAITING FOR MOTHER

SIZE : 25" X 34"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

WAITING FOR MOTHER... तैलचित्र

जगाच्या मळकट घबडग्यात हे

शुभ्र धवल वासरू आपली सात्विकता जपत

शांततेत पहुडलंय...या आशेवर ,

कि त्याची आई थोड्या वेळात परत येईल ...

PROPITIOUS.... तैलचित्र

निखळ , फेसाळणारा झरा..ज्याला फक्त
बघूनच मन प्रसन्न आणि हर्षोल्हासित होत...

PROPITIOUS

SIZE : 49" X 34"

MEDIUM : OIL ON CANVAS

www.vvadkarpaintings.com

PLACIDITY

SIZE : 44" X 22"

MEDIUM : ACRYLIC ON CANVAS

www.vvadkarpaintings.com



PLACIDITY.....ऍक्रेलिक

निरव शांतता ...

लाटांचे तडाखे खात गलबत किनाऱ्याला लागलंय...

आता त्याला हवी असलेली निरव

शांतता त्याला मिळाली आहे ...जणू काही ही गलबतं

शांत पहुडली आहेत किनाऱ्याच्या कुशीत..

प्रोफाईलींग

विवेक किसन वडकर

जन्मदिनांक :- २८ मार्च १९८५

पत्ता :- ए -००४,निलेश अपार्टमेंट, विठ्ठल नगर ता.कर्जत, जिल्हा.रायगड,महाराष्ट्र,पिन- ४१०२०१

मोबाईल क्र. :- +९१-९४२३३७८०२६ / +९१-८९७६११२६१७

ई-मेल :- v.vadkar@gmail.com

शिक्षण :- B.A. A. T. D. (आर्ट टीचर डिप्लोमा)

www.vvadkarpaintings.com

प्रदर्शने

“ताज आर्ट गॅलरी”, मुंबई	सोलो	२०१६
गॅलरी ,"लीला",मुंबई	सोलो	२०१५
गॅलरी ,"लीला",मुंबई	सोलो	२०१४
"फ्युजन" नेहरू सेंटर ",मुंबई	ग्रुप	२०१४/१३/१२/११
गॅलरी ,"लीला",मुंबई	सोलो	२०१३
“जहांगीर आर्ट गॅलरी”,मुंबई	ग्रुप	२०१२

पुरस्कार

- इंटरनॅशनल आर्टिस्ट मॅगझीन अंतिम प्रतिस्पर्धी जून - जुलै २०१२.
- ४९ वा स्टेट गव्हर्नमेंट अवॉर्ड,मार्च २००९- महाराष्ट्र राज्य सरकार द्वारा मुंबई येथे आयोजित
- पुणे आर्ट फेस्टिवल अवॉर्ड, बेस्ट लँडस्केप २०१० .

९ वर्षांच्या कलेच्या या प्रवासादरम्यान फक्त भारतातूनच नव्हे,तर अमेरिका,इंग्लंड ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशविदेशातून त्यांच्या कलेचे चाहते आणि ग्राहक आहेत हे सांगण्यास मोठा अभिमान वाटतो.

PRICE LIST

TRIBAL LIFE

SIZE : 28" X 38"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 80000/-

A JWEL LANE

SIZE : 40" X 22"

MEDIUM : ACRYLIC ON CANVAS

RS. 70000/-

SMEARING OF COLOURS...

SIZE : 48" X 36"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 170000/-

NIDHI

SIZE : 36" X 24"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 50000/-

PRICE LIST



PROPITIOUS
SIZE : 49" X 34"
MEDIUM : OIL ON CANVAS
RS. 150000/-

SEARCHING A TRUE FRIEND
SIZE : 34" X 25"
MEDIUM : OIL ON CANVAS
RS.50000/-

GRACE
SIZE : 33" X 20"
MEDIUM : OIL ON CANVAS
RS.50000/-

PLACIDITY
SIZE : 44" X 22"
MEDIUM : ACRYLIC ON CANVAS
RS. 70000/-

PRICE LIST

WAITING FOR MOTHER

SIZE : 25" X 34"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS.60000/-

SMART APPEARANCE

SIZE : 24" X 19"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 40000/-

FLORIST'S PALETTE

SIZE : 48" X 31"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 170000/-

SOUL FOR SELL

SIZE : 24" X 36"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS.60000/-

PRICE LIST

WATERING PLACE

SIZE : 48" X 19"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS.70000/-

AN ARABLE LAND

SIZE : 22" X 33"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 50000/-

GAME OF REFLECTION...

SIZE : 40" X 27"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 80000/-

GREEN VELVET

SIZE : 24" X 32"

MEDIUM : OIL ON CANVAS

RS. 60000/-

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी लेखक, कवी, चित्रकार, संगीतकार अशा प्रतिभावंतांसाठी एक हक्काचं व्यासपीठ असावं. एकही पैसा न देता.

मराठी वाचक, आणि रसिकांसाठी साहित्य, संगीत, कला सहज उपलब्ध होण्याचं ठिकाण असावं . एकही पैसा न मागणारं.

असं एक व्यासपीठ गेली दहा वर्षं उभं रहात आहे. ई साहित्य प्रतिष्ठान.

ई मेल, व्हाट्स ऍप, वेबसाईट , सीडी, पेनड्राईव्ह, ऍंड्रॉईड ऍप, ब्ल्यु टुथ अशा सर्व मार्गांनी ई साहित्य जगभरातल्या बारा कोटी मराठी माण्सांपर्यंत वाऱ्याच्या वेगाने पसरलं पाहिजे. हाच ध्यास. हाच प्रयास.

हे अशक्य वाटतंय?

अजिबात नाही!

हे व्हायचं तर प्रत्येक मराठी माणसाचा सहभाग असायला हवा. आपल्याकडे जे येईल ते आपल्या ओळखीच्या दहा, शंभर, हजार माणसांना पाठवा. आणि बघा.

मराठी भाषा जगात नंबर एकची भाषा होईल. पैजेवर सांगतो!

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com